'साप्ताहिक शब्दरुतू'चे वार्षिक वर्गणीदार होण्यसाठी क्यूआर कोडवर वार्षिक किंवा मासिक योजनांचे पेमेंट करून मो. ९०११२०१४१४ या व्हाट्सअॅप नंबरवर स्क्रिनशॉट व आपला पूर्ण पत्ता पाठवावा.
**वार्षिक वर्गणी : १८० । मासिक वर्गणी : १४**

# शब्दरुतू

पोस्टल परवाना नं. SRP/136/2023-2026
**कार्यकारी संपादक : सुमीत लांडे, मुंबई**

संपर्क : मो. ९०११२०१४१४
Email ID : shabdarutu@gmail.com

### शेअर बाजारात गुंतवणुकीच्या आमिषाने ४३ लाखांची फसवणूक

पुणे: शेअर बाजारात गुंतवणुकीच्या आमिषाने व्यावसायिकाची सायबर चोरट्यांनी ४३ लाख ५० हजार रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला. याप्रकरणी चोरट्यांविरुद्ध आंबेगाव पोलिसांनी गुन्हा दाखल केला. याबाबत एका व्यावसायिकाने आंबेगाव पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. तक्रारदार व्यावासायिक कात्रज भागातील आंबेगाव खुर्द परिसरात राहायला आहे.

✻ वर्ष २ रे ✻ अंक ३१ वा ✻ रविवार दि. ०४ मे २०२५ (Decl.Regd.No. SR/MAG/11/2021) RNI.NO.MAHMAR/2021/84232 पाने ४ ✻ किंमत ४ रु. साप्ताहिक (Weekly)

## भारताच्या ८ पैकी ५ शेजाऱ्यांना ड्रॅगनचा विळखा

नवी दिल्ली: चीन दक्षिण आशियामध्ये आपले पाय रोवत आहे. कर्ज देऊन आणि मोठे प्रकल्प उभारून चीनने अनेक देशांची कोंडी सुरु केली आहे. यामुळे अनेक देशांची आर्थिक परिस्थिती नाजूक झाली आहे. श्रीलंका, मालदीव, पाकिस्तान, अफगाणिस्तान आणि नेपाळ हे देश अडचणीत आहेत. बांगलादेशमध्येही गडबड सुरु आहे. लोक रस्त्यावर उतरून विरोध करत आहेत. कट्टरतावादी विचारचारा वाढत आहे. उद्योजक राजेश साहनी म्हणतात की दक्षिण आशियातील ८ पैकी ५ अर्थव्यवस्था कोसळल्या आहेत. श्रीलंका, मालदीव, पाकिस्तान, अफगाणिस्तान आणि नेपाळ यांची आर्थिक स्थिती तोळामासा आहे. हे पूर्णपणे खरं नसलं, तरी परिस्थिती गंभीर आहे. चीनच्या या धोरणामुळे भारताला धोका निर्माण झाला आहे.

बांगलादेशमध्ये परिस्थिती ठीक नाही. तिथे कायद्याचं राज्य नाही. लोक हिंसक आंदोलने करत आहेत. कट्टरतावादी विचार वाढले आहेत. सरकार परिस्थितीला आवर घालण्यात कमी पडत आहे.परिस्थिती आणखी बिघडू शकते, असा इशारा सैन्यानेच दिला आहे. महागाई वाढत आहे. गुंतवणूक कमी होत आहे आणि विकास दर ३.३-३.९% पर्यंत खाली आला आहे. त्यामुळे बांगलादेशची अर्थव्यवस्था नाजूक स्थितीत आहे.

श्रीलंकेची अवस्थाही बिकट आहे. थोडा विकास दर असला तरी, गरिबी, महागाई आणि चलनाची घसरण यांसारख्या समस्या आहेत. २०२२ मध्ये श्रीलंका परदेशी कर्ज फेडू शकला नाही. अजूनही त्यांना चीनला त्यांच्या कर्जाचा मोठा भाग द्यायचा आहे. अनेक प्रकल्पांमुळे अपेक्षित फायदा झाला नाही. त्यामुळे कर्ज फेडणे हे



श्रीलंकेसाठी मोठे आव्हान आहे.

मालदीवची अर्थव्यवस्था पर्यटनावर अवलंबून आहे. त्यांचा GDP विकास दर ६.४% राहण्याची शक्यता आहे. पण मालदीवच्या सार्वजनिक कर्जापैकी जवळपास २०% चीनला द्यायचे आहेत. त्यामुळे जर काही संकट आले, तर मालदीवची अर्थव्यवस्था कोलमडू शकते. मालदीव आणि चीन यांच्यातील FTA (फ्री ट्रेड ॲग्रीमेंट) मुळे व्यापार तोटा वाढू शकतो. FTA म्हणजे 'मुक्त व्यापार करार'. यामुळे स्थानिक उद्योगांना फटका बसू शकतो.

पाकिस्तानमध्ये राजकीय अस्थिरता आहे. बेरोजगारी वाढली आहे आणि अर्थव्यवस्था नाजूक आहे. CPEC (चायना-पाकिस्तान इकोनॉमिक कॉरिडोर) च्या माध्यमातून चीनकडून मिळालेल्या कर्जामुळे पायाभूत सुविधा सुधारल्या असल्या, तरी कर्जही वाढले आहे. उझएउ म्हणजे 'चीन-पाकिस्तान आर्थिक मार्ग'. यामुळे पाकिस्तानच्या सार्वभौमत्वावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. गुंतवणूकदारांचा विश्वास अजूनही डळमळीत आहे.

अफगाणिस्तानची अर्थव्यवस्थाही बिकट आहे. हा देश मदतीवर अवलंबून आहे आणि गरिबीशी झुंजत आहे. चीनचा अफगाणिस्तानशी असलेला संबंध कमी आहे, पण तो हळूहळू वाढत आहे. नेपाळ कागदोपत्री स्थिर दिसत असला, तरी चीनसोबतचा व्यापार तोटा वाढत आहे. तो बीजिंग समर्थित पायाभूत सुविधांवर जास्त अवलंबून आहे.

दक्षिण आशियातील अनेक देश चीनच्या कर्जाच्या जाळ्यात अडकत चालले आहेत. यामुळे या देशांच्या अर्थव्यवस्था आणि राजकारणावर वाईट परिणाम होत आहे. या देशांना त्यांची अर्थव्यवस्था सुधारण्यासाठी आणि चीनवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी ठोस पाऊले उचलावी लागतील. भारतासाठी दक्षिण आशियामध्ये चीनचा प्रभाव वाढणे धोक्याचे आहे. कारण भारत हा चीनचा थेट प्रतिस्पर्धी आहे. या सगळ्या परिस्थितीमुळे भारताला सतर्क राहण्याची गरज आहे. चीनच्या वाढत्या प्रभावाला रोखण्यासाठी भारताला आपल्या शेजारी देशांना मदत करावी लागेल आणि त्यांच्यासोबत चांगले संबंध ठेवावे लागतील.


## राज्यात पुढील आठवड्यात अवकाळीची चाहूल

### २६ जिल्ह्यांत पाऊस, वीज आणि गारपीटीचा इशारा; शेतकऱ्यांनी सावधानता बाळगावी

मुंबई :राज्यात सध्या हवामानात सातत्याने बदल होत आहेत. काही भागांमध्ये उन्हाचा तडाखा जाणवत असताना, काही ठिकाणी ढगाळ वातावरणाची स्थिती आहे. याच पार्श्वभूमीवर ज्येष्ठ हवामान अभ्यासक माणिकराव खुळे यांनी राज्यातील आगामी आठवड्याच्या हवामानाचा अंदाज व्यक्त केला आहे. ३ मेपासून १० मेपर्यंत राज्यात अवकाळी वातावरण राहण्याची शक्यता आहे, अशी माहिती माणिकराव खुळे यांनी दिली आहे.


ज्येष्ठ हवामान अभ्यासक माणिकराव खुळे यांनी दिलेल्या माहितीनुसार, महाराष्ट्रातील संपूर्ण कोकण, खान्देश, नाशिक, नगर पुणे सातारा सांगली सोलापूर, धाराशिव बीड नांदेड, गडचिरोली भंडारा गोंदिया चंद्रपूर नागपूर वर्धा अमरावती अशा २६ जिल्ह्यात उद्या शनिवार दिनांक ३ ते १० मे पर्यंतच्या आठवड्यात ढगाळ वातावरण राहून अगदीच किरकोळ ठिकाणी एखाद्या- दुसऱ्या दिवशी वीजा, वारा व गडगडाटीचे वातावरण राहून, झालाच तर अगदीच किरकोळ पावसाची शक्यता जाणवत आहे. या वातावरणाचा प्रभाव विदर्भातील ७ जिल्ह्यांत विशेष जाणवू शकतो, तसेच एखाद्या दुसऱ्या दिवशी किरकोळ गारपीटीचीही शक्यता नाकारता येत नसल्याचे खुळे यांनी सांगितले आहे.

सध्या तरी संपूर्ण महाराष्ट्रात रात्रीचा उकाडा वा कुठेही उष्णतेच्या लाटेची शक्यता जाणवत नाही. अरबी समुद्रात सुमारे दीड किमी उंचीवर प्रत्यावर्ती चक्रीय वाऱ्यांची स्थिती निर्माण झाली आहे. हे वारे घड्याळाच्या काट्याच्या दिशेने फिरतात आणि त्यांच्यासोबत उत्तरेकडून येणारे आर्द्र वारे ४५-५० किमी प्रतितास वेगाने महाराष्ट्रात वाहत आहेत. त्यामुळेच वातावरणीय बदल होऊन




राज्यात अवकाळी पावसाचे वातावरण तयार झाल्याचे माणिकराव खुळे यांनी सांगितले. दरम्यान, शेतकऱ्यांनी विशेष असे घाबरून जाऊ नये. केवळ सावधानता बाळगावी असे खुळे म्हणाले.

**नवी कोरी पुस्तकं**




**इतर गोष्टी**
: लेखकाचे नाव :
प्रसाद कुमठेकर
किंमत रु. : ४५०/-
: प्रकाशन :
**शब्दालय प्रकाशन,**
श्रीरामपूर





**नव्वदीच्या आगेमागे**
: लेखकाचे नाव :
उदगीरकर, भुस्कुटे, आदूबाळ, होळेहोन्नूर
किंमत रु. : ९००/-
: प्रकाशन :
**शब्दालय प्रकाशन,**
श्रीरामपूर

## साईबाबा मंदिर बॉम्बने उडवण्याची धमकी; यंत्रणा अलर्ट मोडवर

शिर्डी: शिर्डीतील साईबाबा मंदिर बॉम्बने उडवून देण्याची धमकी साई संस्थानला ईमेलद्वारे देण्यात आली आहे. हा धमकीचा ईमेल आल्यानंतर सुरक्षा व्यवस्था अलर्ट झाली असून भाविकांच्या सुरक्षेची विशेष काळजी घेण्यात येत आहे. साईबाबा संस्थानसह हजारो पोलिसांचा ताफा सज्ज असून साईभक्तांनी कोणतीही भीती न बाळगता दर्शनासाठी यावं, असं आवाहन साईमंदिर प्रशासनाने केलं आहे.

शिर्डीतील साईबाबा हे लाखो भाविक-भक्तांचे श्रद्धास्थान आहे. हजारो भाविक दररोज साईबाबांचे आशीर्वाद घेण्यासाठी या मंदिरात जात असतात. मात्र शुक्रवारी सकाळी साई संस्थानच्या मेल आयडीवर एका अज्ञात व्यक्तीकडून धमकीचा मेल पाठवण्यात आला. आम्ही साईबाबा मंदिर बॉम्बने उडवू, असा उल्लेख या ईमेलमध्ये करण्यात




आला होता. त्यानंतर सुरक्षा व्यवस्था अलर्ट मोडवर असून भाविकांनी घाबरून जाऊ नये, असं आवाहन मंदिर प्रशासनासह पोलिसांकडून करण्यात आलं आहे.

साईबाबा संस्थानचे सुरक्षा अधिकारी रोहिदास माळी यांच्या तक्रारीवरून शिर्डी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल झाली असून धमकीच्या पार्श्वभूमीवर साईमंदिराची बीडीएस आणि डॉग स्कॉडसह पथकाने कसून तपासणी केली आहे. साईमंदिराच्या सर्व प्रवेशद्वारावर भक्तांचीही कसून तपासणी केली जात असून धमकीचा मेल पाठवणाऱ्या अजित जाकोमोला नावाच्या व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. साईबाबा मंदिराचे हजारो सुरक्षा कर्मचारी आणि पोलीस पथक भक्तांची काळजी घेण्यास सक्षम असून देशभरातील साईभक्तांनी निश्चितपणे साईदर्शनाला यावं, असं आवाहन साईमंदिराचे कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांनी केले आहे.

दरम्यान, यापूर्वी देखील शिर्डीच्या साई संस्थानला धमकीचे मेल आल्याच्या घटना घडल्या होत्या. परंतु यापूर्वीचे पत्र आणि मेल फेक असल्याचं स्पष्ट झालं होतं. अशातच साई संस्थानला पुन्हा धमकीचा मेल आल्याने खोडसाळपणातून कोणी हे कृत्य केले आहे का, या अनुषंगानेही पोलिसांकडून तपास केला जात आहे.

## तुम्हाला शिवसेना चालते, भाजप का नाही? अजितदादांचा शरद पवारांना सवाल

मुंबई : राज्याचे उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजित पवार यांनी शनिवारी पुन्हा एकदा महायुतीसोबत जाण्याच्या आपल्या निर्णयाचे समर्थन केले आहे. तसेच शरद पवारांचे नाव न घेता त्यांना तुम्हाला शिवसेना चालते, पण भाजप का नाही? असा खडा सवालही केला आहे. आम्ही एनडीएसोबत जाऊन काहीच वेगळे केले नाही. कारण, २०१९ ध्ये आपणच शिवसेनेसोबत जाण्याचा निर्णय घेतला होता. तुम्हाला शिवसेना चालते, मग भाजप का चालत नाही? या प्रकरणी कार्यकर्त्यांना सोयीस्करपणे सांगितले जाते, असे ते म्हणालेत.

जळगाव जिल्ह्यातील राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते सतीश पाटील, गुलाबराव देवकर, कैलास पाटील यांच्यासह शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या काही पदाधिकाऱ्यांनी शनिवारी दुपारी अजित पवारांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. यावेळी बोलताना अजित पवारांनी महायुती सरकारसोबत जाण्याच्या आपल्या निर्णयाचे समर्थन केले. तसेच या



प्रकरणी शरद पवारांनाही कोंडीत पकडण्याचा प्रयत्न केला.

अजित पवार म्हणाले, उद्धव ठाकरे यांचे सरकार गेल्यानंतर सर्व आमदारांनी आपल्या वरिष्ठांना आपण सत्तेत सहभागी होऊया असे सांगितले होते. मी सत्तेसाठी हपापलेला माणूस नाही. मी सर्वात जास्त सत्ता उपभोगली आहे. त्यानंतर आम्ही महायुतीसोबत जाण्याचा निर्णय घेतला. एनडीएसोबत जाऊन आम्ही कोणताही वेगळा निर्णय घेतला नाही. कारण, २०१९ मध्ये आपण शिवसेनेसोबत जाण्याचा निर्णय घेतला. तुम्हाला शिवसेनेसोबत जायला आवडते, मग भाजप का चालत नाही? या प्रकरणी कार्यकर्त्यांना सोयीस्करपणे सांगितले जाते.

## गोव्यातील शिरगावमध्ये चेंगराचेंगरी, ७ जणांचा मृत्यू, ५० जखमी

गोवा : गोव्यातील शिरगाव येथे शुक्रवारी रात्री श्री लैराई यात्रेदरम्यान झालेल्या चेंगराचेंगरीत सात जणांचा मृत्यू झाला. शनिवारी सकाळी ही माहिती मिळाली. या दुर्घटनेत ५० हून अधिक लोक जखमी झाले आहेत, त्यापैकी २० जणांची प्रकृती गंभीर आहे. मदत आणि बचाव कार्य सुरू आहे. मृतांचा आकडा वाढू शकतो.


शुक्रवारी संध्याकाळी मोठ्या संख्येने भाविक जत्रेत सहभागी होण्यासाठी मंदिराकडे जात होते. दरम्यान, दुकाना समोरील विजेच्या तारेचा धक्का लागून काही लोक खाली पडले. मग गोंधळ उडाला आणि चेंगराचेंगरी झाली. गर्दी व्यवस्थापनाच्या पुरेशा व्यवस्थेअभावी ही दुर्घटना घडली. मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी या घटनेच्या चौकशीचे आदेश दिले आहेत.

## जिल्ह्यातील ४४ गावांतील पिण्याचे पाणी दुषित

अहिल्यानगर : उन्हाच्या तीव्रतेने जिल्ह्यात अनेक गावे व वाड्यावस्त्यांतून पिण्याच्या पाण्याची टंचाई भासू लागल्याने टँकरसह मिळेल त्या जलस्त्रोतावर नागरिकांना अवलंबून राहावं लागत आहे. परिणामी नागरिकांना दूषित पाणीही प्यावे लागत आहे. गावांना पिण्याचा पाणीपुरवठा करणाऱ्या योजनांच्या जलस्त्रोतांच्या पाणी नमुन्यांची तपासणी जिल्हा परिषदांच्या आरोग्य विभागाने केली असता, गेल्या मार्च महिन्यात तब्बल ४४ नमुने दूषित असल्याचे आढळले आहे.

राजूर (ता. अकोले) येथे दूषित पाण्यामुळे कावीळची साथ पसरून एका मुलीचा मृत्यू तर १२६ रुग्ण आढळले. या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात ४४ गावातील पिण्याच्या पाण्याचे नमुने दूषित आढळल्याची घटना उल्लेखनीय असल्याचे मानले जाते. गेल्या १ मार्च २०२४ पासून ३१ मार्च २०२५ या वर्षभराच्या कालावधीत ४८८ पाणी नमुने दूषित आढळल्याची माहिती आरोग्य विभागाकडून उपलब्ध झाली. जामखेड व कोपरगाव तालुक्यात एकाही गावचे पाणी नमुने दूषित आढळले नाही. इतर सर्व तालुक्यात पाणी नमुने दूषित आढळले. आरोग्य विभागाकडून दरमहा दोन वेळेला बायोमेट्रिक पध्दतीने व एकवेळेला रासायनिक पध्दतीने पाणी नमुने तपासले जातात. नमुने दूषित आढळल्यास संबंधित बीडीओ, ग्रामपंचायतीला कळवले जाते. त्यानुसार पाणी प्रक्रियेवर देखरेख ठेवून पुन्हा पाणी नमुने तपासले जातात.

राजुरमध्ये ८ एप्रिलला पाणी नमुने तपासण्यात आले, ते योग्य आढळले. मात्र २३ एप्रिलला प्रथम काविळीची साथ पसरल्याचे निदर्शनास आले. त्याचा जिल्हा परिषदेचे यंत्रणांनी शोध



घेतला असता, राजुरजवळ यात्रा भरली होती, त्याच दरम्यान भंडारदऱ्याचे आवर्तन सुटले होते. यात्रेसाठी मोठी गर्दी झाली होती. गावची पाणीयोजना एमजीपी'ने तयार केली. ती अद्याप ग्रामपंचायतीकडे हस्तांतरित झालेली नाही. या योजनेची शुध्दीकरण यंत्रणा बंद होती. त्याचा परिणाम काविळीची साथ पसरण्यात झाला असावा असाही अंदाज व्यक्त केला जात आहे. जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाने प्रतिबंधात्मक उपाययोजना केल्या. शुध्दीकरण यंत्रणा कार्यान्वित करून दोन दिवस राजुरचा पाणीपुरवठा बंद ठेवण्यात आला होता. त्यानंतर परिसरातील गावांतील पाण्याचे नमुनेही तपासणीसाठी पाठवण्यात आले आहेत.

### दूषित पाणी नमुने आढळलेली गावे

पिसेवाडी, वाडगी, ब्राम्हणवाडा, विठे, जामगाव, (अकोले), बारडगाव दगडी, बेलवंडी, येसवाडी (कर्जत), नारायणडोह, हिंगणगाव (अहिल्यानगर), देवसडे, जायगुडे आखाडा, दहिगाव (नेवासा), रेनवडी माजमपूर (पारनेर), उपजिल्हा रुग्णालय जोगेवाडी, मोहरी, कासार पिंपळगाव, एकनाथवाडी (पाथर्डी), अस्तगाव (राहता), ताहराबाद, धामोरी बुद्रुक, कोल्हार खुर्द, मल्हारवाडी, चिंचोली रामपूर, चांदेगाव (राहुरी), आश्वी खुर्द, खळी, सायखिंडी (संगमनेर), रांजणी (शेवगाव), चिखलठाणवाडी, पोराचीवाडी, अघोरीवाडी (श्रीगोंदे) तसेच खानापूर व मांडवे (श्रीरामपूर).

# तप्त सोलापुरात तापमानाचा पारा ४४ अंश पार

## एप्रिलमध्ये २५ दिवस तापमान चाळीशीच्या पुढेच

सोलापूर: मागील दोन महिन्यांपासून तापत चाललेल्या सोलापुरात आज गुरुवारी तापमानाचा पारा ४४.१ अंश सेल्सिअसवर पोहोचला. सोलापूरच्या यंदाच्या उन्हाळ्यातील हे तापमान उच्चांकी ठरले आहे. गेल्या एप्रिलमध्ये ३० पैकी तब्बल २५ दिवस तापमान ४० ते ४३ अंशांच्या पुढेच राहिले होते. त्यानंतर मे महिन्याच्या पहिल्याच तारखेला तापमानाने उच्चांक गाठल्याने हैराण झालेल्या सोलापूरकरांची अस्वस्थता आणखी वाढली आहे. सोलापूर आता शोलापूर बनत चालले आहे.

यंदा सोलापुरात उन्हाळा होळीच्या अगोदर पासूनच सुरू झाला होता. मार्च महिन्यात तापमानाने तोंड वर काढायला सुरुवात केली असता १३ मार्च रोजी पहिल्यांदाच तापमान ४०.६ अशांवर गेले होते. त्या महिन्यात ११ दिवस तापमानाचा पारा ४० अंशांच्या पुढेच राहिला होता. त्यातून उष्णतेची झळ सतावत गेली. मागील एप्रिल महिन्यात तापमानात वरचेवर वाढत होत होती. चाळिशी पार केलेल्या तापमानाची सवय झाली असताना त्यात पुन्हा पुन्हा वाढ झाल्याने उष्मा असह्य ठरू



लागला. उष्म्याची छळ बसू लागल्यामुळे दुपारच्या रणरणत्या उन्हात रस्त्यावरील वर्दळ घटत गेली. संपूर्ण महिन्यातील ३० पैकी तब्बल २५ दिवस तापमान किमान ४० अंश ते ४३.८ अंशांपर्यंत मोजण्यात आले.

१ एप्रिल रोजी ४०.१ अंश तापमान नोंद झाल्यानंतर पुढे चार दिवसांचा अपवाद वगळता पुन्हा तापमानाने डोके वर काढले. पुढे ४२ अंश तापमान ओलांडून ४३ पार केलेला पारा २३ एप्रिल रोजी ४३.८ अंश म्हणजे ४४ अंशांच्या घरात गेला होता. काल महिनाअखेर, ३० एप्रिल रोजी तापमान ४३.६ अंशांवर होते. संपूर्ण एप्रिल महिन्यात वाढत्या उष्म्याने अंगाची लाही लाही झाली असताना पुढे मे महिन्याची सुरुवातही सोलापूर आणखी तप्त होण्याने झाली. ४४.१ अंश सेल्सिअस इतके उच्चांकी तापमान मोजण्यात आल्यामुळे मे महिना अस्वस्थ वर्तमान' घेऊन आल्यासारखे सोलापूरकरांना वाटत आहे.

रखडलेला उड्डाणपूल, उन्हाचा तडाखा, वाहनकोंडी आणि त्यात कामबंद'ची भर

गेल्या चार दिवसांपूर्वी अवकाळी पावसाच्या सरी कोसळल्याने तात्पुरता दिलासा मिळाला होता. पण आता पुन्हा तापमानाचा पारा पुढचा टप्पा गाठू लागल्यामुळे वैशाखी वणव्याचे अस्तित्व त्रासदायक ठरू लागले आहे. गरम, उष्ण झळा, कोरडी हवा सकाळपासूनच जाणवत असून रात्री क्वचितच थंड वा-याची झुळूक येते. वाढत्या उष्णतेपासून दिलासा मिळण्यासाठी शीतपेये, पाणीदार फळांचा वापर वाढला आहे. घरात, कार्यालयात विद्युत पंखेही कुचकामी ठरत असून कूलर, एअर कंडिशनर इत्यादी उपकरणांना मागणी वाढली आहे. फ्रीजचा वापर तेवढ्याच जास्त प्रमाणात वाढला आहे. सायंकाळनंतर फेरफटका मारण्यासाठी नागरिक घराबाहेर पडताना दिसून येतात.

# अकोलेतील उडदावणे होणार मधाचे गाव



अकोले : जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, संनियंत्रण समिती यांनी शिफारस केलेल्या आणि मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ यांनी निश्चित केलेल्या १० गावांमध्ये मधाचे गाव' योजना राबविण्यासाठी करावयाच्या खर्चाचे अंदाजपत्रकास मान्यता देण्यात आली आहे. त्यात अहिल्यानगर जिल्ह्यातील अकोलेतील उडदावणे या गावाचा समावेश आहे.

मधमाशीपालन हा राज्यातील एक महत्त्वाचा जोडधंदा होऊ पाहत आहे. मधमाशा या केवळ मध आणि मेणच देत नाहीत तर त्या परपरागीकरणामुळे शेती पीक उत्पादनात ३५ ते ४० टक्के वाढ करतात, असे अभ्यासाअंती आढळून आले आहे. त्यामुळे गावाच्या सकल उत्पन्नात वाढ व्हावी यासाठी मधाचे गाव ही संकल्पना पुढे आली. त्यातूनच आता दुसरा टप्पा होत आहे.

महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ यांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार (१) घोलवड, ता.डहाणु जि. पालघर, (२) भंडारवाडी, ता.किनवट, जि. नांदेड (३) बोरझर, ता. नवापूर, जि. नंदुरबार (४) काकडदाभा, ता. औढ़ानागनाथ, जि. हिंगोली (५) चाकोरे, ता.त्र्यंबकेश्वर, जि. नाशिक (६) उडदावणे, ता. अकोले, जि. अहिल्यानगर (७) शेलमोहा, ता. गंगाखेड, जि. परभणी (८) सिंधीविहीर, ता. कारंजा, जि. वर्धा (९) सालोशी, ता. महाबळेश्वर, जि. सातारा (१०) आमझरी, ता. अमरावती, जि. अमरावती या १० गांवात मधाचे गाव ही योजना राबविण्यासाठी एकूण रु.५,०१,९७,०००/- अक्षरी रुपये पाच कोटी, एक लाख, सत्याण्णव हजार मात्र) इतक्या खर्चाच्या अंदाजपत्रकास अटींच्या अधिन राहून प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात आली आहे.

योजना कार्यान्वित झाल्यानंतर पुढील वर्षांसाठी योजना कार्यान्वीत रहावी याची संपूर्ण जबाबदारी संबंधित गावावर राहील, याबाबतचे हमीपत्र संबंधित ग्रामपंचायतीकडून घेण्यात येणार आहे. ज्या गावांमध्ये शासनाने मंजूर केलेल्या निधीपेक्षा जास्त खर्चाची आवश्यकता भासेल, तो खर्च अन्य योजनेअंतर्गत असलेल्या निधीमधून उपलब्ध करुन देण्याची मुभा जिल्हाधिकाऱ्यांना राहील. मधपेट्यांसाठी लागणारी १० टक्के रक्कम लाभार्थ्यांना द्यावी लागणार आहे. ९० टक्के रक्कम सरकार देणार आहे.

# शेतकरी दाम्पत्याच्या आत्महत्येकडे लक्ष वेधण्यासाठी परभणीत राजू शेट्टी यांची आक्रोश पदयात्रा

परभणी: सरकारने कर्जमाफीचे आश्वासन देऊन शेतकऱ्यांच्या डोळ्यात धुळ फेकली आहे. आज महाराष्ट्रातला शेतकरी स्वतःचा कडेलोट करून घेत आहे पण सत्ताधाऱ्यांना त्याकडे पाहायला वेळ नाही. सत्ताधाऱ्यांच्या डोळ्यात झणझणीत अंजन घालण्याची गरज आहे. साखर कारखान्यांना कोट्यवधी रुपयाचे कर्ज देताना सरकार हमी घेते पण शेतकऱ्यांच्या कर्जमाफीची हमी सरकार घेत नाही अशी टीका स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते तथा माजी खासदार राजू शेट्टी केली.

राजू शेट्टी यांच्या नेतृत्वाखाली काल बुधवारी (दि.३० एप्रिल) माळसोन्ना येथून पदयात्रेस प्रारंभ झाला. ही पदयात्रा आज गुरुवारी महाराष्ट्र दिनी येथे आल्यानंतर प्रशासनाला निवेदन देण्यात आले. या पदयात्रेत शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यावेळी विविध घोषणा असलेले फलक घेऊन पदयात्रेत शेतकऱ्यांनी सहभाग नोंदवला. परभणी जिल्ह्यातील



माळसोन्ना येथे पंधरा दिवसापुर्वी कर्जास कंटाळून सचिन जाधव या तरुण शेतकऱ्याने आत्महत्या केली. त्यानंतर त्याच्या सात महिन्याच्या गर्भवती पत्नीनेही आत्महत्या केली. या प्रश्नावर सरकारचे व प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी शेट्टी यांच्या नेतृत्वाखाली ही पदयात्रा काढण्यात आली.

बुधवारी दुपारी सचिन जाधव यांच्या प्रतिमेस अभिवादन करून आक्रोश पदयात्रेस सुरवात करण्यात आली. त्यानंतर सायाळा येथे या पदयात्रेचा मुक्काम झाला. ही पदयात्रा आज सकाळी परभणी कृषी विद्यापीठ मार्गे जिल्हाधिकारी कार्यालयात पोहोचली. या पदयात्रेत स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे युवा आघाडी प्रदेशाध्यक्ष दामू इंगोले , परभणी जिल्हाध्यक्ष किशोर ढगे , प्रकाश पोपळे, कोल्हापूर जिल्हाध्यक्ष अजित पोवार, शिरोळ पंचायत समितीचे उपसभापती सचिन शिंदे , छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाध्यक्ष कृष्णा साबळे, माऊली मुळे, डॉ. बाळासाहेब पाटील, विक्रम पाटील, रावसाहेब आलासे, नितेश कोगनोळे , नामदेव भराडे , संभाजी यादव , तानाजी मगदूम यांचेसह पदाधिकारी व परिसरातील शेतकरी मोठ्या प्रमाणात पदयात्रेत सहभागी होते. राज्यातील सर्व शेतकरी कर्जमुक्त करण्यात यावेत, आत्महत्या झालेल्या भगवानराव टेकाळे सचिन जाधव यांच्या कुटुंबीयांना घरे बांधून देण्यात यावीत, मराठवाडा व विदर्भातील वाढत्या शेतकरी आत्महत्या थांबवण्यासाठी सोयाबीन आणि कापसाला उत्पादन खर्चावर आधारित रास्त भाव देण्यात यावा, आत्महत्येनंतर शेतकरी कुटुंबाला दिली जाणारी मदत एक लाख रुपयाऐवजी पाच लाख रुपयापर्यंत देण्यात यावी अशा मागण्या यावेळी आक्रोश शेतकरी आत्महत्येचा या पदयात्रेत करण्यात आल्या.

# पोटी लेक नसतानाही केले २५०० मुलींचं कन्यादान



शिर्डी : स्वतःला मुलगी नाही, मात्र हजारो मुलींची डोली सजवणारा बाप माणूस, तो आहे, जवळपास अडीच हजार मुलींचा बाप.. ही गोष्ट आहे शिर्डीतील कैलास कोते नावाच्या बाप माणसाची.. गेल्या २५ वर्षात कोते यांनी सामुदायिक विवाह सोहळ्याच्या माध्यमातून हजारो मुलींचे कन्यादान करत सामाजिक बांधिलकी जपलीये.. यंदा या विवाह सोहळ्याचा रौप्य महोत्सवी वर्ष असल्याने यंदाचा सामुदायिक विवाह सोहळा अधिक थाटात संपन्न झालाय. महागाईच्या या काळात फक्त नाम मात्र सव्वा रुपयात लग्न होत असल्याने यंदा ६५ जोडपी विवाहबद्ध झाली.

सर्वधर्म समभावाची शिकवण देणाऱ्या साई बाबांच्या शिर्डीत कोते दाम्पत्याच्या पुढाकारातून आजतागायत २५०० जोडपी विवाहबद्ध झाली आहेत. यंदाच्या रौप्य महोत्सवी वर्षात हिंदू, मुस्लिम आणि बौद्ध धर्मीय अशी ६५ जोडपी विवाह बंधनात अडकली आहेत. स्वतःला मुलगी नसल्याची खंत मनात असताना २५ वर्षांपूर्वी आईकडून प्रेरणा घेऊन कैलास कोते यांनी सामुदायिक विवाह सोहळ्याची चळवळ हाती घेतली. प्रत्येक वर्षी मोठ्या थाटामाटात सर्वधर्मीय विवाह सोहळा संपन्न होतो आणि त्यामुळे कोते दाम्पत्याला हजारो मुलींचे आई वडील होण्याचे भाग्य लाभले आहे.. विशेष म्हणजे या विवाह सोहळ्यात विदर्भ आणि मराठवाड्यातील वधू वरांची संख्या लक्षणीय असते..

गेल्या २५ वर्षांपासून शिर्डीत सुरू असलेल्या सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळ्यात अवघा सव्वा रुपया नाममात्र शुल्क भरून नोंदणी करता येते. कोते दाम्पत्याकडून वधू-वरांना नवे पोशाख, सोन्याच्या मंगळसूत्राची भेट, संसार उपयोगी वस्तू, वऱ्हाडी मंडळींना मिष्टान्न भोजन दिले जाते. त्यासाठी कोते परिवार आणि नातेवाईक स्वतःच्या मुलींचे लग्न असल्याप्रमाणे तयारी करतात. नवरदेवांची उंट घोड्यावरती मिरवणूक काढली.

# पद्मश्री विखे पाटील कारखान्याच्या चौकशीला सामोरे जाण्याची तयारी - ना. विखे पाटील

लोणी : पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील सहकारी साखर कारखान्याच्या संदर्भात सर्वोच्च न्यायालयात सादर झालेल्या चौकशी अहवालानंतर सदर प्रकरणात कोणताही फौजदारी स्वरुपाचा गुन्हा दाखल होत नसल्याचा निष्कर्ष २०१९ मध्येच सर्वोच्च न्यायालयाने स्पष्टपणे दिल्यामुळे आम्हाला कोणतीही चिंता नाही. आमची कोणतीही अडचण नाही. त्यामुळे आमच्या दृष्टीने हे प्रकरण संपले आहे. नव्याने पुन्हा काही चौकशी होणार असली तर, त्याला सामोरे जाण्याची आमची तयारी असल्याची स्पष्ट भूमीका जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केली.

कारखान्याच्या संदर्भात प्रसारित झालेल्या वृत्ताबाबत बोलताना ना. विखे पाटील म्हणाले, याबाबतची नेमकी वस्तुस्थिती समजून घेणे गरजेचे आहे. २००४ साली झालेले प्रकरण आमच्या विरोधकांनी २०१४ मध्ये उकरुन काढले. याबाबत स्थानिक न्यायालया पासून ते उच्च आणि सर्वोच्च न्यायालयांमध्ये याबाबतच्या सुनावण्या झालेल्या आहेत. उच्च न्यायालयाने नेमलेल्या चौकशी अधिकाऱ्यांचा अहवाल सर्वोच्च न्यायालयात सादर झाल्यानंतर २०१९ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणात कोणताही फौजदारी स्वरुपाचा गुन्हा होत नसल्याचे स्पष्ट करुन, याचिका निकाली काढलेली आहे. त्यामुळे आमच्यादृष्टीने हे प्रकरण




केव्हाच संपलेले असल्याचे ना. विखे पाटील यांनी ठामपणे सांगितले.

सर्वोच्च न्यायालयाने राहाता न्यायालयाचे न्यायदंडाधिकारी यांचा कलम १५६(३) प्रमाणे केलेला आदेश कायम ठेवल्याने सदरचा गुन्हा दाखल झाला आहे. कोणतीही चौकशी ही गुन्हा दाखल झाल्याशिवाय होऊ शकत नाही. त्यामुळे या गुन्ह्याच्या आधारे पुन्हा याच प्रकरणात नव्याने होणाऱ्या चौकशीला सामोरे जाण्याची कारखाना व्यवस्थापनाची तयारी आहे. मार्च २०२५ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणात दिलेल्या आदेशात कारखाना व्यवस्थापन व इतरांच्या विरोधात त्रास होईल अशी कोणतीही जबरदस्तीची कारवाई करु नये असा स्पष्ट आदेश दिलेला असल्याने या प्रकरणातील सर्वच स्पष्टता आता समोर आलेली असल्याचे ना. विखे पाटील म्हणाले. शिर्डी विधानसभा मतदार संघातील जनतेने सलग आठ वेळा चांगल्या मताधिक्याने मला निवडून दिले आहे.

# दौंडमधील वरवंडच्या मातीत मियाझाकी आंबा पिकवलाय पुणेकर शेतकऱ्याने

पुणे : उन्हाळ्यातील फळांचा राजा म्हटलं की,आपल्या नजरेसमोर लगेच आंबा येतो आणि त्यामध्ये हापूस, पायरी, लालबाग, केशरी या आंब्याचा आस्वाद केव्हा घेण्यास येईल.आपण याची वाट पाहत असतेच, तर आता आंब्याचा हंगाम सुरू झाला असून अनेक ठिकाणी आंबे विक्रीस ठेवण्यात आले आहेत. आपल्या येथील हापूस आंबा हा परदेशात राहणाऱ्या नागरिकांना देखील येथुन पार्सलद्वारे मिळु लागला आहे. आपल्या येथील आंबे परदेशात जाऊ लागले आहेत.पण याच परदेशातील जवळपास ९० आणि आपल्या येथील ३० अशी एकूण १२० आंब्याच्या झाडांची लागवड केवळ २० गुंठयात पुण्यातील वरवंड भागातील फारूक इनामदार या शेतकऱ्यांनी केली आहे. तर यामध्ये विशेष बाब म्हणजे जपान येथील मियाझाकी या आंब्याची लागवड करण्यात आली असून तो जपान येथे २ लाख ७० हजार रुपये किलोमध्ये मिळतो.

तोच आंबा आपल्या देशात दीड लाख रुपये किलोमध्ये आहे.याबाबत फारूक इनामदार म्हणाले की,आमची वरवंड भागात शेती असून आम्ही सर्व प्रकरची पिक घेत आहोत,आमच्या शेतामध्ये सुरुवातीपासून काही आंब्याची झाड आहेत.पण मी काही वर्षांपूर्वी हज यात्रेला गेलो होतो.




त्यावेळी त्या ठिकाणी जगभरातील सर्व फळ आलेली होती.ती सर्व फळ पाहिल्यावर त्या मध्ये सर्वाधिक आंब्याचे विविध प्रकार होते.त्या सर्व आंब्याची माहीती घेतली आणि आपल्या इथ आल्यावर अनेक देशातून झाड मागविण्यात आल्यानंतर, २० गुंठे जागेत तब्बल १२० आंब्याची झाडांची लागवड केली.यामध्ये आपल्या देशातील ३० आबांच्या झाडांसह परदेशातील ९० झाडांचा त्यामध्ये समावेश आहे. ही सर्व आंब्याची झाड लावून दोन वर्षाचा कालावधी उलटून गेला असून चांगली फळ आली आहेत.

तसेच त्या फळांबाबत सांगायच झाल्यास,रेड आफ्रिकन,रेड तैवान, अरुनीका,बनाना मँगो,ऑस्ट्रेलिया मधील ए२ आर २,बांगलादेश येथील कटोमोनी, बांगलादेश चा शाहजान या आंब्याची लागवड करण्यात आली आहे.ही सर्व आंबे काही हजार रुपये किलोमध्ये मिळणार,पण यामध्ये मियाझाकी हा जपान येथील असून त्या ठिकाणी २ लाख ७० हजार रुपये किलोमध्ये मिळतो.पण तो आंबा आपल्या देशात दीड लाख रुपये किलोपर्यंत मिळतो.साधारणपणे किलोमध्ये ४ ते ६ आंबे बसू शकतात. सरासरी ३०० ग्राम एका आंब्याच् वजन असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच ते पुढे म्हणाले,कोयतूर या झाडाला ८ ते १० किलो पर्यंतच आंबे येतात आणि त्या झाडांच्या एका आंब्याची दीड ते पाच हजार रुपये किंमत आहे. तसेच आता येत्या काळात ही सर्व आंबे विक्रीस जाणार असून आम्ही अनेक देशातील आंबे लागवड करण्याचा प्रयत्न करणार आहे.त्यामुळे शेतकरी वर्गाने नवनवीन पीक घेऊन आपल उत्पन्न कसे वाढेल याकडे लक्ष दिले पाहीजे,असे आवाहन देखील त्यांनी शेतकरी वर्गाला त्यांनी केले.

| | | |
|---|---|---|
| चिमण्या चिवचिवल्या | - मा.रा.लामखडे | रु. १०० |
| टिकली तर टिकली | - श्रद्धा बेलसरे | रु. १५० |
| रानसय | - भास्कर चंदनशीव | रु. २२५ |
| निःशब्द कोलाहल | - धनंजय गोवर्धने | रु. ११० |
| आधुनिक मराठी गेय कविता | - डॉ.सयाजीराजे मोकाशी | रु. १७५ |
| मुके जाते गाणे गाते | - विनायक बंगाळ | रु. ९० |
| कानडी मुलखातील मुशाफिरी (प्रवास वर्णन) | - मा.रा.लामखडे | रु. २२० |
| पैंजणांचे झाड | - सिसिलिया कार्व्हालो | रु. १५० |
| काळोखाला दूर सारून | - प्रतिभा जाधव | रु. १४० |
| साळुंकीची सावली | - महावीर जोंधळे | रु. १८० |
| उत्कर्षवाटा (पुणे विद्यापीठ) | - संपा.डॉ.लांडगे, डॉ.रोंगटे, डॉ.सांगळे | रु. १२० |
| रंग जीवनाचे | - बबन काकडे | रु. २५० |
| च्यामारी | - डॉ.प्रमोद काळे | रु. १८० |
| कुब्र | - सत्यजित पाटील | रु. २३० |
| **नाटक/एकांकिका/चित्रपट विषयक** | | |
| तुंबारा | - सयाजी शिंदे | रु. २५० |
| तृतीय रत्न (नाटक) (जळगाव विद्या. अभ्यासक्रमात समाविष्ट) | - ले.जोतिराव फुले, संपा. दत्ता भगत | रु. २२५ |
| माझं घर | - जयंत पवार | रु. १६० |
| जनक | - शार्दुल सराफ | रु. १५० |
| हंडाभर चांदण्या (संहिता आणि लेख) (पुणे विद्यापीठ) | - दत्ता पाटील/ संपा.सतिश बडवे | रु. १५० |
| राहिले दूर घर माझे | - शफाअत खान | रु. १४० |
| चौक | - मकरंद साठे | रु. १२० |
| मंथरक आणि इतर एकांकिका | - जयसिंग पाटील | रु. ९० |
| जाता नाही जात | - सिद्धार्थ तांबे | रु. १५० |
| सप्तरंगी एकांकिका | - दयाराम गिलाणकर | रु. १२० |
| प्रत्ययकारी परदेशी सिनेमा | - उदय कुलकर्णी | रु. ६५० |
| **चरित्र/आत्मचरित्र** | | |
| श्री.संत चोखामेळा : चरित्र आणि अभंग | - संपा.स.भा.कदम, प्रस्ता.भालचंद्र नेमाडे | रु. १६० |
| जिजी (शेतकरी आईची जीवनगाथा) | - प्रा.सौ.लिला जंजिरे | रु. २०० |
| कोकरूड ते बर्मिंगहॅम | - प्रा.अब्दुलगनी अत्तार | रु. ३७५ |
| सुंबरान | - दिनकर यमनाजी शेलार | रु. २५० |
| पंख गळून गेले तरी | - सुधीर देवरे | रु. ८० |
| स्त्रीरत्न क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले | - रावसाहेब चोले | रु. ७५ |
| मलिक अंबर | - वि.स.वाकसकर | रु. १०० |
| लावणी सम्राज्ञी (यमुनाबाई वाईकर यांचे चरित्र) | - प्रभाकर ओव्हाळ | रु. २५० |
| कांताबाई सातारकर | - संतोष खेडलेकर | रु. २०० |
| स्वातंत्र्यसूर्य महाराणा प्रताप | - अभिमन्यू सूर्यवंशी | रु. २०० |
| संत मीराबाई | - अभिमन्यू सूर्यवंशी | रु. २०० |
| मी तो हमाल | - आप्पा कोरपे | रु. १५० |
| प्रकाशाची बेटे | - अभिमन्यू सूर्यवंशी | रु. २२० |
| **कविता संग्रह** | | |
| बालकवींच्या निवडक कविता | - संपा.ना.धों.महानार | रु. ११५ |
| वसा | - वसंत सावंत | रु. ७५ |
| सुमती लांडे : समग्र कविता | - संपादक : कविता मुरुमकर/ सुमती लांडे | रु. ५९९ |
| कमळकाचा | - सुमती लांडे, चित्रप्रत्यय- प्रभाकर कोलते | रु. २०० |
| वाहते अंतर | - सुमती लांडे | रु. ९० |
| तुकाराम : अहिराणीत निरुपण | - डॉ.एस.के.पाटील | रु. ५२५ |
| बोलावे ते आम्ही (साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त) | - श्रीकांत देशमुख | रु. ३८० |
| येरू म्हणे | - प्रवीण बांदेकर | रु. १०० |
| बोलावे ते आम्ही | - श्रीकांत देशमुख | रु. ३८० |
| ऋतुपर्णाच्या कविता | - जितेंद्र कुंवर | रु. ३०० |
| आवानओल | - अजय कांडर | रु. १०० |
| प्रलयानंतरची तळटीप | - सुचिता खल्लाळ | रु. २२५ |
| दंडविधान | - मनोज सुरेंद्र पाठक | रु. २७० |
| एक शून्य प्रतिक्रिया | - व्यंकटेश चौधरी | रु. २०० |
| माणूस उकरून काढावा लागतोय | - सिसिलिया कार्व्हालो | रु. २०० |
| ज्याचा त्याचा चांदवा | - अंजली ढमाळ | रु. २२० |
| दुभंगवाणी | - डॉ.नंदू मुलमुले | रु. १५० |
| गरम झळा आणि संभ्रमाची फळे | - पोपट सातपुते | रु. १०० |
| भुईशास्त्र (साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त) | - ऐश्वर्य पाटेकर | रु. २२० |
| भुई तापाचे बळी | - प्रभाकर महाजन | रु. १६० |
| हिन्दोल | - संध्या शहापुरे | रु. २५० |
| अस्वस्थ क्षणांचे पाश | - समाधान महाजन | रु. १२० |
| विसविशीत जगण्याच्या उंबरठ्यावरून | - विलास माळी | रु. २०० |
| तहानलेले पाणी | - मारुती सावंत | रु. १२० |
| पाच बिघे | - लक्ष्मण बारहाते | रु. ८० |
| रक्तसेतू | - सुखदेव ढाणके | रु. १०० |
| हुर्दुक | - सुखदेव ढाणके | रु. ९० |
| ओले अथांग श्वास | - रामकली पावसकर | रु. १०० |

| | | |
|---|---|---|
| स्त्री कुसाच्या कविता | - लक्ष्मण महाडीक | रु. १२५ |
| कुणब्याची कविता | - लक्ष्मण महाडीक | रु. १३० |
| बळीचं जिणं | - दयाराम गिलाणकर | रु. १०० |
| कविता दिक्षेच्या | - महेंद्र भास्कर पाटील | रु. ८० |
| मेघवृष्टी | - जयराम खेडेकर | रु. १०० |
| विलग | - गणेश आत्माराम वसईकर | रु. ९० |
| वादळवाट | - वंदना महाजन | रु. १५० |
| जिवन नरहची आसामी कविता | - अनु.शोभा नाईक | रु. ७५ |
| ब्रम्हसोपान | - रेषा आकोटकर | रु. ९० |
| एक टुकडा आसमाँ का | - विश्वजीत तुळजापूरकर | रु. ७५ |
| एका गोरज घडीला (O.P) | - अरुण सांगोळे | रु. ७५ |
| नांगरून पडलेलं शतक | - रमेश चिल्ले | रु. ८० |
| अनुकार | - जयश्री पाठक | रु. ९० |
| खानदानी | भगवान देशमुख | रु. ८० |
| जगण्याच्या कोलाहलात | - गणेश मरकड | रु. २०० |
| आयडियल स्टेटच्या हद्दीबाहेरून | - सिद्धार्थ तांबे | रु. ७० |
| ओळींनी अंबर व्हावे | - रमेश मगरे | रु. ११० |
| निरिच्छ नभ | - विनायक त्र्यं.पाटील | रु. ७० |
| रूप-अरूपाचे | - अशोक सोनवणे | रु. १०० |
| भोग सरू दे उन्हाचा | - कैलास दौंड | रु. ९० |
| इंद्रधनूच्या कमानीवर | - राजेश जाधव | रु. १०० |
| अक्षरऋतू | - प्रमोद जोशी | रु. १०० |
| रानभरारी | - गुंफा कोकाटे | रु. ८० |
| पाऊल खुणा | - संजीव दुधाट | रु. ८० |
| बाणगंगेच्या तिरी | - डॉ.मधुकर कवडे | रु. ९० |
| जन्मांतर | - शुभम अनिल दुरगुडे | रु. १२० |
| निवडक कविता | - संपा.प्रा.डॉ.वसंत शेकडे | रु. १०० |
| फिर्याद | - हिरा बनसोडे | रु. १०० |
| दाहगाथा | - कैलास सलादे | रु. १२० |
| अकुतोभय | - निलेश शेळके | रु. १४० |
| संदर्भासहित स्पष्टीकरण | - इरावती इंगवले-यादव | रु. १२० |
| सूर्य गेला नाही अजून अस्ताला | - विनायक हिरवे | रु. १५० |
| जखमी पावलांचे ठसे | - कैलास जिजाबाई चावडे | रु. १२० |
| केकतीची फुले | - ल.सि.जाधव | रु. १०० |
| काव्यबंध (मुंबई विद्यापीठ) | - संपा.डॉ.नीलकंठ शेरे/डॉ. नानासाहेब यादव/ डॉ.जगदिश राणे | रु. २०० |
| मी मातीचे फूल | - मीनल येवले | रु. २०० |
| ऐन पस्तिशीत | - दिलीप वीरखेडे | रु. ८० |
| काव्यभान | - रविंद्र कांबळे | रु. १०० |
| धुनी (O.P) | - सुरेश सावंत | रु. २०० |
| काहीच नष्ट होत नसतं | - विजय चोरमारे | रु. १६० |
| गाव हाकेच्या अंतरावर (O.P) | - जगदीश कदम | रु. १२० |
| माणूसनामा | - कैलास पगारे | रु. १२० |
| साकल्याच्या प्रदेशात | - डॉ.सिसिलिया कार्व्हालो, डॉ.धनाजी गुरव, डॉ.निलकंठ शेरे | रु. १५० |
| अधांतर अंधारात | - महेश केळुसकर | रु. २२० |
| आत्मपीठ | - मंदाकिनी पाटील | रु. २६० |
| पद्म गोपाळ | - सौ.निर्मला काळे | रु. ३०० |
| काव्यरंग | - डॉ.आरेकर, डॉ.यादव, डॉ.राणे | रु. २२० |
| हंबरवाटा | - संतोष आळंजकर | रु. २५० |
| दंडविधान | - मनोज पाठक | रु. २७० |
| कथार्सिस | - सारिका उबाळे | रु. ३४० |
| **चरित्र** | | |
| संत गाडगेबाबा | - विजय पाटील | रु. ३० |
| बहिणाबाई चौधरी | - मृण्मयी पाटील | रु. ३० |
| अहिल्याबाई होळकर | - विजया पाटील | रु. ३० |
| स्त्रीरत्न सावित्रीबाई फुले | - रावसाहेब चौले | रु. ७५ |
| अहिल्याबाई होळकर | - मृण्मयी पाटील | रु. ५० |
| बहिणाबाई चौधरी : चरित्र आणि निवडक कविता | - सुमती पाटील | रु. ५० |
| डॉ.अब्दुल कलाम : चरित्र आणि कार्य | - सुमती पाटील | रु. ५० |
| इंदिरा गांधी : चरित्र आणि कार्य | - मृण्मयी पाटील | रु. ५० |
| पंडित जवाहरलाल नेहरु : चरित्र आणि कार्य | - सुमती पाटील | रु. ५० |
| महात्मा ज्योतिबा फुले : चरित्र आणि कार्य (O.P) | - सुमती पाटील | रु. ५० |
| राष्ट्रपिता महात्मा गांधी | - मृण्मयी पाटील | रु. ५० |
| सावित्रीबाई फुले : चरित्र आणि कार्य (O.P) | - सुमती पाटील | रु. ५० |
| सम्राट अशोक : चरित्र आणि कार्य | - सुमती पाटील | रु. ५० |
| शाहू महाराज : चरित्र आणि कार्य | - मृण्मयी पाटील | रु. ५० |
| जे.आर.डी.टाटा | - मृण्मयी पाटील | रु. ५० |
| यशस्वी भारतीय महिला (O.P) | - सुमती पाटील | रु. ५० |
| झाशीची राणी : चरित्र आणि कार्य | - सुमती पाटील | रु. १०० |
| पंडित दीनदयाळ उपाध्याय | - सुमती पाटील | रु. ५० |

| | | |
|---|---|---|
| **सामान्यज्ञान** | | |
| आधुनिक बेकरी व्यवसाय तंत्रज्ञान | - यू.डी.चव्हाण | रु. १००० |
| **शैक्षणिक/बाल/कुमार/प्रौढ साक्षर/इत्यादी** | | |
| निसर्गाकडे चला | - डॉ.गजानन पाटील | रु. १४० |
| तंत्र तणावमुक्तीचे | - डॉ.गजानन पाटील | रु. ४० |
| तंत्र व्यक्तिमत्व विकासाचे भाग १ | - डॉ.गजानन पाटील | रु. ६० |
| तंत्र व्यक्तिमत्व विकासाचे भाग २ | - डॉ.गजानन पाटील | रु. १२५ |
| मानसिक तणावमुक्त अध्यापन प्रतिमान (O.P) | - डॉ.गजानन पाटील | रु. १०० |
| पर्यावरण प्रकल्प कार्य (O.P) | - डॉ.तरुजा भोसले | रु. २५० |
| शालेय ग्रंथालय व्यवस्थापन | - डॉ.सी.श्री.पाटील | रु. १५० |
| शब्दसंपदा : निवडक भाषणे | - डॉ.भगवान सावंत | रु. ८० |
| सप्तरंगी एकांकिका | - दयाराम गिलाणकर | रु. १२० |
| आठवणी यदुनाथांच्या | - संपा.डॉ.प.शं.झेंडे | रु. ७० |
| योगासनांची ओळख | - डॉ.प.शं.झेंडे | रु. ४५ |
| अध्यात्म, विज्ञान व संस्कार मूल्य | - दत्तात्रय चिताळकर | रु. १०० |
| गीतइसापनीती | - उषा परब | रु. ८० |
| करामती प्रकाश | - विजय नांगरे | रु. ५० |
| ओंजळीतील मोती | - प्रमिला हनुमंतराव रासकर | रु. १२० |
| एड्स | - विजया पाटील | रु. १५ |
| चिकुनगुणिया | - डॉ.एस.के.पाटील | रु. १५ |
| नखे कापा - निरोगी राहा | - डॉ.राजेंद्र मलोसे | रु. ३५ |
| खानदेशी गाव | - आबा महाजन | रु. १८० |
| नखपुराण | - डॉ.राजेंद्र मलोसे | रु. १५ |
| परोपकारी शंकर | - विजय नांगरे | रु. १५ |
| बहुगुणी तुळस | - डॉ.मंगला काजळे | रु. १५ |
| आपला नांदेड जिल्हा | - सुमती पाटील | रु. ३० |
| मालगुंडचा सिद्धू | - आनंद वाघ | रु. ३०० |
| बालसंस्कार | - ताई पवार | रु. १०० |
| आम्ही भी घडणार | - ताई पवार | रु. ११५ |
| विज्ञान कोडे | - ताई पवार | रु. १२० |
| दिशा नवोपक्रमाची | - ताई पवार | रु. १४० |
| श्री गणेशा शिक्षणाचा | - ताई पवार | रु. ९० |
| छत्रपती शिवाजी राजेभोसले यांचा पवाडा | - महात्मा ज्योतीराव फुले | रु. १०० |
| गुलामगिरी | - महात्मा ज्योतीराव फुले | रु. १५० |
| शेतकऱ्याचा असूड | - महात्मा ज्योतीराव फुले | रु. १५० |
| योग - सर्वांसाठी | - आनंद वाघ | रु. २५० |
| योगा - खेळ, छंद आणि संस्कार | - आनंद वाघ | रु. २५० |
| कोवीड १९ - अकल्पीत चकवा | - आनंद वाघ | रु. २०० |
| स्त्री - पुरुष तुलना | - ताराबाई शिंदे - संपा.महेंद्र मुंजाळ | रु. १२५ |
| महाराष्ट्रातील समाजसुधारक | - अे. देशमुख | रु. ८० |

### कृषि विषयक पुस्तके

**डॉ. यू. डी. चव्हाण / डॉ. पी. जी. पाटील**

| | |
|---|---|
| मधुमक्षिका पालन - आळींबी लागवड (शेतीतील जोडधंदे) | रु. ७२० |
| पेपेन उद्योग - रेशीम उद्योग (शेतीतील जोडधंदे) | रु. ७०० |
| कुक्कुट पालन-ससे पालन (शेतीतील जोडधंदे) | रु. ७०० |
| शेळी पालन - मेंढी पालन (शेतीतील जोडधंदे) | रु. ७१० |
| पशुपालन व दुग्धव्यवसाय - गांडुळ खत निर्मिती प्रकल्प | रु. ७०० |
| वराह पालन - मत्स्य उद्योग (शेतीतील जोडधंदे) | रु. ७०० |
| महिलांना करता येण्यासारखे उद्योग (शेतीतील जोडधंदे) | रु. ६९० |
| कृषि अवजारे व यंत्राचा उपयोग (शेतीतील जोडधंदे) | रु. २६० |
| मसाला प्रक्रिया उद्योग | रु. ५७० |
| मत्स्य प्रक्रिया उद्योग | रु. ७०० |
| आंबा-केळी-द्राक्ष प्रक्रिया उद्योग | रु. ६५० |
| अननस-चिकू-पेरु प्रक्रिया उद्योग | रु. ६३० |
| अंजिर-चिंच-जांभूळ-पपई-स्ट्रॉबेरी प्रक्रिया उद्योग | रु. ६५० |
| आवळा-डाळींब-बोर-प्रक्रिया उद्योग | रु. ६५० |
| दूध व दुग्धजन्य पदार्थ | रु. ६५० |
| फळभाज्या प्रक्रिया उद्योग | रु. ६४० |
| काजू-कवठ-फालसा-कृष्णफळ-करवंद-सफरचंद-कोकम-फणस-उंबर-लिची प्रक्रिया उद्योग | रु. ६५० |
| लिंबूवर्गीय फळे प्रक्रिया उद्योग | रु. ६३० |
| मांस-मटन-अंडी प्रक्रिया उद्योग | रु. ६५० |
| टोमॅटो-बटाटा-कांदा-लसून-प्रक्रिया उद्योग | रु. ६१० |
| तृणधान्य-कडधान्य-गळीतधान्य प्रक्रिया उद्योग | रु. ७१० |
| वाईन उद्योग | रु. ७५० |
| कृषि क्षेत्रातील कृषि उद्योग | रु. ५५० |
| कृषि प्रक्रिया उद्योग कोश | रु. २००० |
| अक्षय उर्जा | रु. १७० |


**शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर यांची महत्त्वाची पुस्तके मागविण्यासाठी खालील नंबरवर संपर्क करा – मो. ९०११२०१४१४ / ९८२२५२५४४४**

CMS
CREATIK
MULTI SERVICES PVT LTD



Digital India
Vision India
MAKE IN INDIA
MSME

Discover Pustakvari :
The Ultimate eBook Platform
State-of-the-Art eBook Readers
Advanced Security and Technology
Intelligent Search and Realistic Viewing Experience
Expansive Content Library
Global Accessibility and Multi-Publisher Platform
Tailored Solutions for Institutes and Libraries
Interactive Learning with General Knowledge Software
Smart Recommendations and User Customization



Contact US
Email : creatikpvtltd44@gmail.com
Contact : +91 22 3599 9192 I +91 9822525444
Website : creatikmultiservices.com

Gut No. 125, Ranjankhol, Tal. Rahata, Dist. Ahmednagar 413709

# महाराष्ट्र व गुजरात देशाच्या विकास आणि जागतिक पटलावर नाव चमकणारी राज्ये : केंद्रीय गृहमंत्री अमित शाह

नवी दिल्ली : भारताला समृद्ध करणारे भारताचे नाव जागतिक पटलावर येण्यात मोठी भूमिका निभावणारे महत्वाचे राज्य ठरणाऱ्या महाराष्ट्र आणि गुजरात राज्यांचा राज्य आज दिवस आहे. या दोन्ही राज्यांना त्यांच्या स्थापना दिवसाच्या शुभेच्छा देत हा प्रवास असाच सुरू राहील, असे प्रतिपादन केंद्रिय गृहमंत्री तथा सहकार मंत्री अमित शाह यांनी आज येथे केले.

दिल्लीतील उपराज्यपाल विनय कुमार सक्सेना यांच्या मार्गदर्शनात सायंकाळी दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता आणि केंद्रीय गृहमंत्री श्री. शाह यांच्या प्रमुख उपस्थितीत महाराष्ट्र आणि गुजरात राज्यांचा राज्य दिवस आज डीडीए असिता ईस्ट पार्क, विकास मार्ग येथे साजरा करण्यात आला. त्यावेळी श्री. शाह बोलत होते. या कार्यक्रमास सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश प्रसन्न वराळे, केंद्रीय क्रीडामंत्री मनसुख मांडवीया, दिल्लीचे तसेच गुजरातचे राज्यमंत्री, महाराष्ट्र सदनच्या निवासी आयुक्त तथा सचिव आर विमला, महाराष्ट्र आणि गुजरातचे दिल्ली स्थित विविध क्षेत्रातील निवासी या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित होते.

केंद्रीय श्री. शाह पुढे म्हणाले, गुजरात व महाराष्ट्र यांनी, कोणताही वाद न घालता, एकाच राज्यातून निर्माण झालेले दोन स्वतंत्र राज्य म्हणून परस्पर सन्मान राखत विकासाच्यादृष्टीने स्पर्धेच्या माध्यमातून देशाच्या विकासात मोलाचे योगदान दिले आहे. हे एक उत्कृष्ट उदाहरण ठरले आहे. पंतप्रधान मोदींनी एक भारत, श्रेष्ठ भारत या संकल्पनेद्वारे भाषिक व सांस्कृतिक विविधतेतून एकतेचा संदेश दिला असून आज




विविध भाषा व संस्कृती एकमेकांना बळ देतात. व्यक्ती मनोमन ठरवले की फूट निर्माण करणाऱ्या प्रत्येक गोष्टीचा अंत करायचा आहे, तर त्याचे आदर्श उदाहरण मोदींनी एक भारत, श्रेष्ठ भारत ची कल्पना साकारून दाखवले आहे.

महाराष्ट्र, ही वीर छत्रपती शिवाजी महाराजांची भूमी, त्यांनी आणि बाजीराव पेशव्यांसारख्या सेनानींनी मुगल सत्तेला जबरदस्त प्रतिकार देत स्वराज्य, स्वधर्म व स्वभाषेचे रक्षण केले. स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे हे लोकमान्य टिळकांनी पुढे नेले. सामाजिक सुधारणा, भक्ती चळवळ यामध्ये महात्मा फुले, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर आणि वीर सावरकर यांचे योगदान संपूर्ण भारतासाठी प्रेरणादायक ठरले. गुजरात, जेथे श्रीकृष्णांनी जीवन व्यतीत केले, तेथे स्वामी दयानंद सरस्वती, महात्मा गांधी व सरदार पटेल यांसारख्या थोर नेत्यांचा जन्म झाला. त्यांनी स्वातंत्र्य चळवळ घडवून आणली. स्वातंत्र्यानंतर देशाच्या एकात्मतेसाठी व प्रगतीसाठी गुजरात व महाराष्ट्र या राज्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. आज महाराष्ट्रात गरबा तर गुजरातमध्ये गणेशोत्सव उत्साहाने साजरा होतो. ही परस्पर संस्कृतीची देवाणघेवाण भारताची खरी ताकद आहे.

महाराष्ट्र हे देशाची आर्थिक राजधानी असून गुजरातची जीएसडीपी ३० लाख कोटी रुपयांहून अधिक झाली आहे. गुजरातमध्ये देशातील सर्वात मोठा बंदर, रिफायनरी, एशियातील सर्वात मोठा अक्षय ऊर्जा पार्क, पहिली बुलेट ट्रेन, गिफ्ट सिटी आणि आता धोलेरा स्मार्ट सिटी उभी राहत आहे. वायब्रंट गुजरात आणि मॅग्निफिसंट महाराष्ट्र हे दोन्ही राज्य भारताच्या विकासाचे मजबूत स्तंभ आहेत. दोन्ही राज्यांनी २०४७ पर्यंतचा आपला विकास आराखडा निश्चित केला आहे. या दोन राज्यांनी आपल्या वारशाचा सन्मान राखत आधुनिकतेला स्वीकारले असून देशाच्या एकात्मतेसाठी मोलाचे योगदान दिले आहे. मोदींनी मांडलेली महान भारताची संकल्पना साकार करण्यासाठी ही राज्ये आरोग्यदायी विकास स्पर्धेच्या माध्यमातून देशाच्या प्रगतीचा मार्ग प्रशस्त करत आहेत. २०४७ मध्ये जेव्हा भारत विकसित राष्ट्र बनेल, तेव्हा गुजरात आणि महाराष्ट्र यांचा सर्वाधिक वाटा असेल.

# सृजनशीलतेत चैतन्य निर्माण करण्याची क्षमता - पंतप्रधान नरेंद्र मोदी

## क्रिएट इन इंडिया चॅलेंजमधील विजेत्यांशी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी साधला संवाद




मुंबई : व्यक्तीला चैतन्यमय व प्रसन्नतेने जगण्याचा अनुभव देण्याची ताकद ही सृजनशीलतेत आहे. त्याचप्रमाणे वाईट गोष्टींना निष्प्रभ करण्याची क्षमता असलेली सृजनशीलता प्रत्येकाने आपल्या परीने जोपासावी, असे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले.

वांद्रे कुर्ला संकुलातील जिओ वर्ल्ड सेंटरमध्ये वेव्हज-२०२५ (जागतिक दृकश्राव्य मनोरंजन समिट) चा आरंभ झाला. यावेळी क्रिएट इन इंडिया चॅलेंज' मधील विजेत्यांशी पंतप्रधान मोदी यांनी संवाद साधला. यावेळी राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी म्हणाले की, भारताला संगीत, नाटकासह विविध कला प्रकारांचा समृद्ध वारसा लाभला आहे. तो अधिक वृद्धिंगत करण्यासाठी नव्या पिढीतील सृजनशीलतेला नाविन्यपूर्ण संकल्पनांसाठी विविध संधी उपलब्ध करून देत प्रोत्साहन देण्याची गरज आहे. ज्याप्रमाणे आपले शरीर कोणत्याही अपायकारक बाह्य गोष्टीला स्वीकारत नाही, त्याचप्रमाणे माणसाची सृजनशीलता वाईट गोष्टींना आपल्या मनामध्ये टिकू देत नाही. आपले मन उल्हसित ठेवण्याची महत्त्वाची भूमिका सृजनशीलता पार पडत असते. संगणकावर आपल्या बोटांचा वापर करणारा संगणक अभियंता थकतो तर त्याचवेळी एखादा वयोवृद्ध सतारवादक त्या संगणक अभियंत्याच्या तुलनेत जास्त प्रसन्न, उल्हासित राहतो. हा फरक सृजनशीलतेमुळे पहावयास मिळतो. त्यामुळे प्रत्येकाने आपल्यातील कला, सृजनशीलतेला प्रोत्साहन देत जोपासली पाहिजे. भारत सर्व क्षेत्रात जागतिक स्तरावर आपला ठसा उमटवत आहे. त्याच धर्तीवर सृजनशीलतेच्या क्षेत्रात वेव्हज'च्या माध्यमातून पुढे आलेल्या नाविन्यपूर्ण संकल्पना यशाचा मोठा पल्ला गाठतील,असे सांगून प्रधानमंत्री मोदी यांनी या स्पर्धेतील सर्व विजेत्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

तत्पूर्वी प्रधानमंत्री मोदी यांनी क्रिएट इन इंडिया चॅलेंज'मधील विजेत्यांच्या दालनांना भेट देऊन त्यांच्या संकल्पनांची माहिती घेतली.

## महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद यांच्या पत्रानुसार राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र, पुणे यांच्यातर्फे निवडण्यात आलेली नगरपालिका व जिल्हापरिषद शाळेंसाठी निवडक वाचनीय पुस्तकांची यांदी

| अ.नं. | पुस्तकाचे नाव | लेखक | किंमत |
|---|---|---|---|
| १ | गोष्ट कॉम्प्युटरची | संदीप लांडे | 100 |
| २ | जलऊर्जा | संदीप लांडे | 130 |
| ३ | अंतराळ- २ | संदीप लांडे | 150 |
| ४ | रोमांचकारी सफर | सौ.संज्योत बानुबाकोडे | 100 |
| ५ | पेरणी | आबा गोविंदा महाजन | 100 |
| ६ | हिऱ्यांची पिशवी | संज्योत बनूबकोडे | 100 |
| ७ | करामती प्रकाश | विजय नागरे | 150 |
| ८ | अद्भूताचा शोध | विजय नागरे | 130 |
| ९ | जग बदलणारे ५० शोध | आनंद वाघ | 120 |
| १० | घाबरलेल्या सुषमाची गोष्ट | सुमति लांडे | 130 |
| ११ | प्राणी गायब होऊ लागले | आबा गोविंदा महाजन | 150 |
| १२ | बोधकथा | मृण्मयी पाटील | 100 |
| १३ | संवेदना आणि इतर कथा | बाळ पोतदार | 110 |
| १४ | पीठाचा माठ | संतोष खेडलेकर | 100 |
| १५ | आनंदी गाणी | स्नेहा पाटील | 100 |
| १६ | मुलांसाठी शोर्यकथा | संतोष खेडलेकर | 110 |
| १७ | बिल्लू | श्यामला एस. | 100 |
| १८ | करामती मुंग्या | संज्योत बनूबकोडे | 100 |
| १९ | जलधारा | मृण्मयी पाटील | 100 |
| २० | अशी मोडली खोड | मृण्मयी पाटील | 100 |
| २१ | निसर्ग माझा सवंगडी | संदीप लांडे | 100 |
| २२ | पवन ऊर्जा | संदीप लांडे | 130 |
| २३ | निसर्गाचे संवर्धन का करावे | संदीप लांडे | 200 |
| २४ | सौर ऊर्जा | संदीप लांडे | 130 |
| २५ | शाळा सवंगडी | विजय नागरे | 130 |
| २६ | आमची शाळा | विजय नागरे | 130 |
| २७ | कौशल्य | विजय नागरे | 100 |
| २८ | इवलासा ससा | संज्योत बनूबकोडे | 100 |
| २९ | स्वातंत्र्यसंग्रामाच्या शौर्यकथा | संतोष खेडलेकर | 100 |
| ३० | पिंकू आणि सोनू | श्यामला एस. | 100 |
| ३१ | महानायक | संतोष खेडलेकर | 100 |
| ३२ | संस्कार कथामाला | संज्योत बनूबकोडे | 100 |
| ३३ | देण्याचा आनंद | संज्योत बनूबकोडे | 100 |
| ३४ | सफर जगातल्या आश्चर्याची | संतोष खेडलेकर | 120 |
| ३५ | किलबिल गोष्टी | नामदेव माळी | 150 |
| ३६ | हिम्मत | विजय नागरे | 150 |
| ३७ | बी ची गोष्ट | सुनील भोडगे | 100 |
| ३८ | दोरीची करामत | विजय नांगरे | 100 |
| ३९ | ऐतिहासिक शौर्यकथा | संतोष खेडलेकर | 130 |
| ४० | चांगला मित्र | सौ.संज्योत बानुबाकोडे | 100 |
| ४१ | सईचे पंख | विजय नागरे | 150 |
| ४२ | मी अब्दुल कलाम | मृण्मयी पाटील | 100 |
| ४३ | पाण्याविषयी सर्वकाही | संदीप लांडे | 100 |
| ४४ | नाच रे मोरा | सूचित पाटील | 100 |
| ४५ | कावळा काळा कसा झाला | श्यामला एस. | 100 |
| ४६ | रोबोट माझा मित्र | विशाल तायडे | 160 |
| ४७ | उद्धट नंदू | श्यामला एस. | 100 |
| ४८ | झाडाची गोष्ट | शाल्मल लांडे | 100 |
| ४९ | चला पावसाच्या पाण्याची बचत करू | संदीप लांडे | 130 |
| ५० | कचरा व्यवस्थापन | संदीप लांडे | 200 |
| ५१ | हुशार बकरी | बाळ पोतदार | 100 |
| ५२ | आपले हरित घर | संदीप लांडे | 100 |
| ५३ | आपली हरित शाळा | संदीप लांडे | 100 |
| ५४ | मालगुंडचा सिद्धू | आनंद वाघ | 100 |
| ५५ | अद्भुत पोषोख | विजय नांगरे | 160 |
| ५६ | सातपुड्याच्या जंगलामध्ये | आबा गोविंदा महाजन | 100 |
| ५७ | रणरागिणींच्या शौर्यकथा | संतोष खेडलेकर | 100 |
| ५८ | बबलू खरेदीला जातो | श्यामला एस. | 100 |
| ५९ | चिंटू नावाचा कोल्हा | श्यामला एस. | 100 |
| ६० | दोन जादूगार | रमेश महाले | 100 |
| ६१ | हरवलेला धबधबा | श्यामला एस. | 100 |
| ६२ | चतुर कोल्हा वेंधळा बोकड | मृण्मयी पाटील | 100 |
| ६३ | दिनेशची समुद्र किनाऱ्यावरील सफर | श्यामला एस. | 100 |
| ६४ | प्राणीसृष्टी भाग-१ | रमेश महाले | 200 |
| ६५ | कागा आणि नारळ | श्यामला एस. | 100 |
| ६६ | दिशा नवोपक्रमाची | ताई पवार | 160 |
| ६७ | नशिबाची साथ | विजय नागरे | 100 |
| ६८ | वृक्षगान | लैला महाजन | 100 |
| ६९ | वृक्षवल्ली आम्हा सोयरे | लीलावती भागवत | 100 |
| ७० | म्हणींचा शोध मनास बोध | म.ना. जोशी | 100 |
| ७१ | एकमेका सहाय्य करू | म.ना. जोशी | 100 |
| ७२ | राजा पिल्लाची गोष्ट | लीलावती भागवत | 100 |
| ७३ | छान छान गोष्टी | रोहिणी कुलकर्णी | 100 |
| ७४ | बछडा | मुकुंद निगवेकर | 100 |
| ७५ | संस्कार गोष्टी | म.ना. जोशी | 100 |
| ७६ | सुबोध कथा | मीरा जाधव | 100 |
| ७७ | उपेक्षित बालके | म.ना. जोशी | 100 |
| ७८ | चोरीची माया | बबन खंडगळे | 100 |
| ७९ | गोष्ट राम्पुरीची | बबन खंडगळे | 100 |
| ८० | टीमटीमणारे तारे | स्नेहलता बावळे | 100 |
| ८१ | १११ बोधकथा | हेमंत गोखले | 100 |
| ८२ | सृष्टीशी जडवू नाते | लीलावती भागवत | 100 |
| ८३ | आदर्श गोष्टी | शोभा जोशी | 100 |
| ८४ | अशीही दिवाळी | वर्षा गडकर | 100 |
| ८५ | स्वप्नाचा पाठपुरावा | वर्षा गडकर | 100 |
| ८६ | म्हणीच्या बोधकथा | म.ना. जोशी | 100 |
| ८७ | मजेदार मज्जा | स्नेहलता बावळे | 100 |
| ८८ | व्यंगावर मात | वर्षा गडकर | 100 |
| ८९ | धाडसी आजी | वर्षा गडकर | 100 |
| ९० | आपले पक्षी-सखे सोबती भाग १ | मंगेश कश्यप | 100 |
| ९१ | आपले पक्षी-सखे सोबती भाग २ | मंगेश कश्यप | 100 |
| ९२ | आपले पक्षी-सखे सोबती भाग ३ | मंगेश कश्यप | 100 |
| ९३ | छोट्यांसाठी मोठ्या गोष्टी | वर्षा गडकर | 100 |
| ९४ | सुसंस्कारीत मनोबल | शोभा जोशी | 100 |
| ९५ | मुल नव्हे देवदूतच | नीला कदम | 100 |
| ९६ | वसा स्वावलंबनाचा | शोभा जोशी | 100 |
| ९७ | गुडबाय छोट्या मित्रा आणि इतर गोष्टी | विनया साठे | 100 |
| ९८ | एक झाड लावू मित्रा | अनंत भावे | 100 |
| ९९ | गोष्टीरूप चाणक्य | राजेंद्र खरे | 150 |
| १०० | माणुसकीचा श्वास | नीला कदम | 100 |
| १०१ | पोषक गोष्टी भाग १ | शोभा जोशी | 100 |
| १०२ | पोषक गोष्टी भाग २ | शोभा जोशी | 100 |
| १०३ | विचार यशाचाच | वर्षा गडकर | 100 |
| १०४ | खरी कमाई | शोभा जोशी | 100 |
| १०५ | नातं | वर्षा गडकर | 100 |
| १०६ | बाल रक्षक कायद्याचे | अविनाश भोंडवे | 100 |

**वरील पुस्तके मागविण्यासाठी समोरील नंबरवर संपर्क करा - मो. ९०११२०१४१४/९८२२५२५४४४**

# वैभव सूर्यवंशी शून्यावर बाद सामन्यानंतर रोहित शर्माची पाठीवर थाप



मुंबई इंडियन्स विरुद्ध राजस्थान रॉयल्सच्या सामन्यात मुंबईने एका मोठ्या विजयाची नोंद केली. प्रथम फलंदाजी करताना मुंबईच्या संघाने २१८ धावांचे आव्हान दिले होते. या धावांचा पाठलाग करताना राजस्थान रॉयल्सच्या वैभव सूर्यवंशीकडे अनेकांच्या नजरा लागल्या होत्या. गुजरात टायटन्सविरुद्ध खेळलेल्या मागच्याच सामन्यात वैभव सूर्यवंशीने ३५ चेंडूत खणखणीत शतक ठोकले होते. त्यामुळे जसप्रीत बुमराह, बोल्ट आणि दीपक चहर यांचा तो कसा सामना करणार? याची उत्सुकता होती. मात्र दोन चेंडू खेळून तो शून्यावर बाद झाला. निराशाजनक कामगिरी झाल्यामुळे वैभव सूर्यवंशी हिरमुसला होता. पण सामन्यानंतर रोहित शर्माने त्याच्याबरोबर केलेली कृती आता सर्वांचे लक्ष वेधून घेत आहे.

गुजरात टायटन्सच्या सामन्यात तुफानी खेळी खेळल्यानंतर १४ वर्षांचा क्रिकेटपटू वैभव सूर्यवंशी चर्चेत आहे. त्याच्याबद्दल क्रिकेटवर्तुळासह इतरही क्षेत्रात चर्चा होत आहे. आयपीएलमधील सर्वाधिक जलद शतक ठोकणारा तो पहिला भारतीय फलंदाज ठरला. त्यामुळे राजस्थान रॉयल्सच्या प्रत्येक सामन्यात त्याच्या खेळीकडे क्रिकटप्रेमीचे नक्कीच लक्ष असणार आहे.

गुरूवारी राजस्थानच्या घरच्या मैदानावर सामना असल्यामुळे संघाचे अनेक चाहते मैदानावर उपस्थित होते. मात्र वैभव सूर्यवंशीसह राजस्थानच्या एकाही फलंदाजाला समाधानकारक कामगिरी करता आली नाही. अवघ्या १६ षटकांत ११७ धावांवर राजस्थानचा संघ सर्वबाद झाला. विशेष म्हणजे तळाला फलंदाजीसाठी येणारा गोलंदाज जोफ्रा आर्चरने संघासाठी सर्वाधिक ३० धावा केल्या. २७ चेंडूत २ चौकार आणि २ षटकारांच्या मदतीने ३० धावा केल्या.

### रोहित शर्माची पाठीवर थाप

सामना संपल्यानंतर दोन्ही संघाचे खेळाडू हस्तांदोलनासाठी रांगेत येत असताना रोहित शर्मा आणि वैभव सूर्यवंशी समोरासमोर आले. यावेळी रोहित शर्माने वैभव सूर्यवंशीच्या पाठीवर थाप मारली आणि त्याच्या खेळीचे कौतुक करत त्याच्याशी काही वेळ हितगुज साधले. यावेळी माजी क्रिकेटपटू आणि समालोचक रवी शास्त्री यांनी म्हटले की, रोहित शर्माच्या प्रेरणादायी शब्दांतून वैभव सूर्यवंशी नक्कीच काहीतरी शिकेल.

रवी शास्त्री यांनी पुढे म्हटले की, मुंबई इंडियन्सचा प्रत्येक खेळाडू वैभव सूर्यवंशीला प्रोत्साहन देत होता. मुंबई संघाचा प्रत्येक खेळाडू वैभवशी काही ना काही बोलत पुढे जात होता. काल त्याने शतक ठोकले होते, आज तो शून्यावर बाद झाला. पण खेळात हे होतच असते, हे त्याला शिकायला मिळेल.

साप्ताहिक शब्दरुतू - हे पत्र मालक, प्रकाशक सुमती साईनाथ लांडे यांना मुद्रक विजय दत्तात्रय नगरकर यांनी आदित्य प्रिंटर्स, कामगार सदन, क्रॉस मेनरोड, श्रीरामपूर-४१३७०९, जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून शब्दालय प्रकाशन, पोस्ट बॉक्स नं.९०, वार्ड नं.७, आयडीया टॉवरजवळ, श्रीरामपूर ४१३७०९, जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक- सुमती साईनाथ लांडे
Total Code - SR.NO./MAG/11/2021